# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळा

---

दि. १४/०३/२०२४

### शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये प्रथम प्रथम वर्ष बी.ए., बी.कॉम., एम.ए., एम.कॉम. या वर्गांमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांकरिता सूचना

१) शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये बी.ए., बी.कॉम., एम.ए. व एम.कॉम. सत्र पद्धती या अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षास प्रवेशित विद्यार्थ्यांचे सर्व विषयांचे मूल्यमापन १०० गुणांसाठी होणार आहे.

२) प्रत्येक विषयासाठी ३० गुणांचे अंतर्गत मूल्यमापन हे अभ्यास केंद्रांद्वारे होणार असून अंतर्गत मूल्यमापनासंदर्भात सर्व विद्यार्थ्यांनी त्यांच्या अभ्यासकेंद्राशी संपर्कात राहून अभ्यास केंद्रांद्वारे दिल्या जाणाऱ्या सूचनांनुसार निर्धारित वेळेमध्ये अंतर्गत मूल्यमापन पूर्ण करणे आवश्यक आहे. कोणत्याही विषयामध्ये उत्तीर्ण होण्याकरिता अंतर्गत मूल्यमापनामध्ये ३० गुणांपैकी किमान १२ गुण मिळविणे आवश्यक आहे.

३) प्रत्येक विषयासाठी सत्रांत परीक्षा ७० गुणांची होणार असून त्याचे वेळापत्रक विद्यापीठाच्या परीक्षा विभागामार्फत जाहीर करण्यात येणार आहे. यासंदर्भातील सविस्तर सूचना परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांच्या http://exam.unipune.ac.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सर्व विद्यार्थ्यांनी सदर संकेतस्थळास नियमितपणे भेट देऊन वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सूचनांची दखल घ्यावी.

४) कोणत्याही विषयामध्ये उत्तीर्ण होण्याकरिता सत्रांत परीक्षेमध्ये ७० गुणांपैकी किमान २८ गुण मिळविणे आवश्यक आहे.

५) सदर सत्रांत परीक्षेसाठी प्रश्नपत्रिका आराखडा सोबत जोडला आहे.

६) प्रथम वर्ष बी.कॉम. या वर्गाच्या 112-I Financial Accounting या विषयाच्या सत्रांत परीक्षेमध्ये ७० गुणांची लेखी परीक्षा असेल. तसेच अंतर्गत मुल्यामापनाच्या ३० गुणांपैकी २०

गुण हे प्रात्यक्षिक परीक्षेसाठी असतील आणि २० गुणांपैकी १० गुण हे प्रयोगवही व १० गुण हे मौखिक परीक्षा यासाठी असतील.

६.१) सदर विषयाच्या ७० गुणांच्या प्रश्नपत्रिकेचा आराखडा सोबत जोडला आहे.

६.२) प्रात्यक्षिक परीक्षा ही विद्यार्थ्याच्या अभ्यास केंद्रावर होईल. यासंदर्भात सर्व विद्यार्थ्यांनी त्यांच्या अभ्यासकेंद्राशी संपर्कात राहून अभ्यास केंद्रांद्वारे दिल्या जाणाऱ्या वेळापत्रकानुसार प्रात्यक्षिक परीक्षेस उपस्थित राहणे आवश्यक आहे.

६.३) प्रात्यक्षिक परीक्षेवेळी विद्यार्थ्याकडे प्रमाणित प्रयोगवही असणे आवश्यक आहे.

६.४) 112-I Financial Accounting या विषयामध्ये उत्तीर्ण होण्यासाठी सत्रांत परीक्षेमध्ये ७० गुणांपैकी किमान २८ गुण आणि अंतर्गत मूल्यमापनामध्ये ३० गुणांपैकी किमान १२ गुण मिळविणे आवश्यक राहील.

७) अंतर्गत मूल्यमापनास अनुपस्थित राहणाऱ्या / अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना व्दितीय सत्रामध्ये अंतर्गत मूल्यमापन पूर्ण करता येईल. सत्रांत परीक्षेमध्ये अनुपस्थित राहणाऱ्या / अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना द्वितीय सत्रांत परीक्षेवेळी प्रथम सत्राच्या अनुत्तीर्ण विषयांची परीक्षा देता येईल. परंतु, अशा विद्यार्थ्यांनी अनुशेषित (backlog) परीक्षा अर्ज भरणे आवश्यक राहील. अनुशेषित (backlog) परीक्षा अर्ज भरण्यासंदर्भातील सूचना सत्र-१ च्या परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळेच्या http://unipune.ac.in/SOL/ या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

Sd/-

| | |
|---|---|
| शिक्षणक्रम समन्वयक | संचालक |
| मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळा | मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळा |

# Savitribai Phule Pune University
## School of Open and Distance Learning
## Question Paper Format

### End-Semester Examination
### M.A. & M.Com. Semester-I

| **Time :03 Hours** | **Questions** | **Total Marks:70** |
|---|---|---|
| Que.No.1 | Attempt any five out of seven from the following | 5X2=10 |
| Que.No.2 | Attempt any four out of six from the following | 4X5=20 |
| Que.No.3 | Attempt any four out of six from the following | 4X5=20 |
| Que.No.4 | Attempt any two out of four from the following | 2X10=20 |

### B.A. & B.Com. Semester-I

| **Time :03 Hours** | **Questions** | **Total Marks:70** |
|---|---|---|
| Que.No.1 | Attempt any ten out of twelve from the following | 10X1=10 |
| Que.No.2 | Attempt any five out of seven from the following | 5X5=25 |
| Que.No.3 | Attempt any five out of seven from the following | 5X5=25 |
| Que.No.4 | Attempt any one out of two from the following | 1X10=10 |